19 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक-संशोधन कार्य कौतुकास्पद

■ डॉ. रविंद्र कुलकर्णी : विद्यापीठाचा ६१ वा वर्धापनदिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक व संशोधकीय क्षेत्रात अतुलनिय कामगिरी केली आहे. विद्यापीठाचे हे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापन दिन समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. कुलकर्णी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्यामुळे विद्यापीठाचा नावलौकिक सर्वदूर आहे. राज्यात 'नॅक' मूल्यांकनात ३.५२ गुणांकनासह राज्यात अव्वल ठरलेल्या शिवाजी विद्यापीठाने मुंबई विद्यापीठालाही मदत केली. त्यामुळे मुंबई विद्यापीठाने ३.६६ गुणांकनासह ए प्लस प्लस मानांकन मिळविले. शिक्षक विद्यार्थ्याला वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह माहिती देऊन सक्षम बनवितो. ती क्षमता या तंत्रज्ञानात अद्याप नाही. त्याचप्रमाणे लघु व मध्यम उद्योग-व्यवसायांसोबत सहकार्यवृद्धी करण्याच्या दिशेने भारतीय विद्यापीठांनी आगेकूच करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजवंदन करताना कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी आदी मान्यवर.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने राज्यात आघाडी घेतली आहे.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. जगन कराडे यांना, तर बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. विनोद भीमराव शिंपलेयांना प्रदान करण्यात आला. प्रा. मनमोहन शर्मा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल स्कूल ऑफ नॅनो सायन्स व टेक्नॉलॉजीचे डॉ. तुकाराम डोंगळे यांचाही सत्कार झाला.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

## 'आधारवड' स्मृतीग्रंथाचे प्रकाशन

'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत 'आधारवड' या स्मृतीग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' मधुन शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या आठवणी व लेखांचा संग्रह या स्मृतीग्रंथामध्ये आहे. याचे संपादन डॉ. जी.पी. माळी यांनी केले आहे. सहाय्यक संपादक म्हणून डॉ. डी.के. सरगर व डॉ. एन.एल. तरवाळ यांनी काम पाहिले आहे.

## विद्यापीठ गीताच्या रिंगटोनचे लोकार्पण

शिवाजी विद्यापीठाच्या 'कीर्ती तुझी मंगलमय स्मरणी असू दे, ज्ञान हेच अमृत हे ब्रीद असू दे...' या विद्यापीठ गीताचे गतवर्षी लोकार्पण करण्यात आले होते. यंदाच्या वर्धापनदिन समारंभात या गीताच्या मोबाईल रिंगटोन्सचे कुलगुरू डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या गाण्याची धून सचिन जगताप यांनी तयार केली आहे.

19 NOV 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची संशोधनातील भरारी गौरवास्पद

## कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक व संशोधकीय कार्याद्वारे ठसा उमटवला आहे. विद्यापीठाची ही भरारी गौरवास्पद आहे, असे कौतुकोद्गार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. कुलकर्णी म्हणाले, 'नॅक' मूल्यांकनात ३.५२ गुणांकनासह राज्यात अव्वल ठरलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या चमूने मुंबई विद्यापीठासही अमूल्य मदत केल्याने मुंबई विद्यापीठ तिसऱ्या पुनर्मूल्यांकनात ३.६६ गुणांकनासह 'अ++' मानांकन मिळवू शकले. ही सहकार्याची भावना व भूमिका फार मोलाची आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने राज्यात आघाडी घेतली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीमध्ये सर्वच घटकांचा वाटा आहे. माहिती संवाद तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून अनेक दर्जेदार सॉफ्टवेअर निर्माण केले आहेत आणि ते उत्तमरीत्या कार्यान्वितही आहेत. त्यामुळे विद्यापीठातील रोखीचे सर्व व्यवहार, दीक्षान्त समारंभाचे कामकाज, तसेच पीएच. डी.ची प्रवेशापासून ते निकालापर्यंतची सर्व प्रक्रिया ऑनलाईन आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

**'आधारवड' स्मृतिग्रंथाचे प्रकाशन :** प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रेरणेतून विद्यापीठात सुरू झालेल्या 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन'च्या माध्यमातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी घडले. त्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी भवनच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने लिहिलेल्या आठवणी व लेखांचा संग्रह 'आधारवड'चे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथाचे संपादन डॉ. जी. पी. माळी यांनी, तर सहायक संपादक म्हणून डॉ. डी. के. सरगर, डॉ. एन. एल. तरवाळ यांनी काम पाहिले.

.1 9 NOV 2023

**पुण्यनगरी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ वर्धापनदिनी गुणवंतांचा सत्कार

**। कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ६१वा वर्धापनदिन उत्साहात झाला. या वेळी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

'नॅक'चे 'अ++', 'अ+' आणि 'अ' मानांकन मिळविणाऱ्या २६ संलग्नित महाविद्यालयांचा वर्धापनदिन समारंभात गौरव करण्यात आला. यामध्ये टेक्स्टाइल अँन्ड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, कोल्हापूर, कर्मवीर हिरे कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँन्ड रिसर्च, कोल्हापूर, डॉ. जे.जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, जयसिंगपूर, श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगाव, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर, शिवराज कला व वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली, डॉ. अशोक गुजर टेक्निकल इन्स्टिट्यूट्स डॉ. दौलतराव आहेर इंजिनीअरिंग महाविद्यालय, कराड, दहीवडी महाविद्यालय, दहीवडी,



अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी. फार्मसी, आष्टा, बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, डी.पी. भोसले महाविद्यालय, कोरेगांव, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी, कोल्हापूर, बळवंत महाविद्यालय, विटा, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर (सातारा), धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर, श्री वेंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, विलिंग्डन कॉलेज, सांगली, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा (सातारा), तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर आणि आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली.

संलग्न महाविद्यालयांच्या गुणवंतांचा सत्कारही करण्यात आला. यामध्ये गुणवंत प्राचार्य : डॉ. सर्जेराव पाटील, प्राचार्य, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली. गुणवंत शिक्षक : डॉ. सारंग भोला, कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँन्ड रिसर्च, वर्ये, जि. सातारा. गुणवंत सेवक : सागर पाटील, मुख्य लिपिक, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, इस्लामपूर, जि. सांगली. बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. विनोद शिंपले, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

19 NOV 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षकांना पर्याय ठरू शकत नाही

## कुलगुरू डॉ. कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात : शिक्षक, प्राचार्य, संस्थांचा सन्मान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा चॅट-जीपीटी ही एका चांगल्या शिक्षकाला कधीही पर्याय ठरू शकत नाही, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या शैक्षणिक व संशोधकीय कार्याद्वारे ठसा उमटविला आहे, असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापन दिन व गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.



**कोल्हापूर : मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना डॉ. जगन कराडे. शेजारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे, अजितसिंह जाधव. (छाया : अर्जुन टाकळकर)**

डॉ. कुलकर्णी म्हणाले, भारतीय विद्यापीठांना जागतिक विद्यापीठाचा वेध घेऊन वाटचाल करावी लागणार आहे. आपली विद्यापीठे शैक्षणिक, संशोधकीय, पूरक उपक्रम आणि सामाजिक दायित्व या चारही बाबतीत चांगली कामगिरी करीत आहेत. मात्र, त्याबरोबरीने क्षमतावर्धनाच्या दिशा शोधण्याची आवश्यकता आहे. परदेशी विद्यापीठे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामधील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात. आपणही आपल्या जगभर पसरलेल्या विद्यार्थ्यांशी जोडले जाण्यासाठी धोरण राबविणे आवश्यक आहे. शिक्षकांनी, संशोधकांनी आता कन्सल्टन्सी सेवांचा विस्तार करण्याचीही आवश्यकता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता हा शिक्षकाला पर्याय ठरू शकत नाही. एक विवेकी शिक्षक विद्यार्थ्याला वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह माहिती देऊन सक्षम बनवितो. ती क्षमता या तंत्रज्ञानात अद्याप नाही. या तंत्रज्ञानाच्या आधारे बिग डाटा विश्लेषण करीत असताना नैतिक मार्गांनी त्याचे व्यवस्थापन आवश्यक आहे. त्यासाठी योग्य धोरणे आखली पाहिजेत.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने माहिती संवाद तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून अनेक दर्जेदार सॉफ्टवेअर्स निर्माण केले आहेत. पीएच.डी. प्रवेशापासून ते निकाल जाहीर करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. नव्या धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक दूरगामी बदल होऊ घातले आहेत. पुढील १५ वर्षांत सारेच चित्र बदललेले असेल. त्याचा वेध घेऊन विद्यापीठाने आपल्या कॅम्पसवर अनेक नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

वर्धापन दिनानिमित्त कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

### विद्यापीठातील गुणवंतांचा सत्कार

गुणवंत शिक्षक : डॉ. जगन कराडे (समाजशास्त्र अधिविभाग), गुणवंत सेवक सुरेश तुकाराम बंडगर (सहायक कुलसचिव), विजय बापूसाहेब माजगावकर (अधीक्षक), नंदिनी दिगंबर पाटील (सहायक अधीक्षक), सदानंद शिवाजी सुभेदार (हवालदार), सतीश दत्तू केसरकर (ग्रंथालय मदतनीस), गुणवंत प्राचार्य : डॉ. सर्जेराव रघुनाथ पाटील (प्राचार्य, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली), गुणवंत शिक्षक : डॉ. सारंग भोला (कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये, जि. सातारा), गुणवंत सेवक : सागर भास्कर पाटील (मुख्य लिपिक, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, इस्लामपूर, जि. सांगली), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. विनोद भीमराव शिंपले (न्यू कॉलेज, कोल्हापूर) या शिवाजी विद्यापीठातील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

19 NOV 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



गुणवंतांचा सत्कार : शिवाजी विद्यापीठात शनिवारी गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. जगन कराडे, डॉ. विनोद शिपले, डॉ. तुकाराम डोंगळे, सुरेश बंडगर, विजय माजगावकर, नंदिनी पाटील, सतीश केसरकर, सदानंद सुभेदार, सागर पाटील, डॉ. सारंग भोला, डॉ. सर्जेराव पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

# संशोधकांनी कन्सल्टन्सी सेवांचा विस्तार करण्याची गरज

## डॉ. रवींद्र कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापनदिन उत्साहात; मान्यवरांचा गौरव


लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कन्सल्टन्सी आऊटपुटमध्ये भारत खूप मागे आहे, ही चिंतेची बाब आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षकांनी, संशोधकांनी आता कन्सल्टन्सी सेवांचा विस्तार करण्याचीही आवश्यकता आहे, असे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी शनिवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कुलगुरू डॉ. कुलकर्णी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या चमूने मुंबई विद्यापीठासही अमूल्य मदत केल्याने मुंबई विद्यापीठ तिसऱ्या पुनर्मूल्यांकनात 'A' मानांकन मिळवू शकले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने माहिती संवाद तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून अनेक दर्जेदार सॉफ्टवेअर निर्माण केले आहेत. यावेळी गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, पाल्ये यांचा व नॅकचे मानांकन मिळविणाऱ्या २६ महाविद्यालयांचा गौरव करण्यात आला. यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार प्राणिशास्त्र अधिविभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांना देण्यात आला. 'आधारवड' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या ग्रंथाचे संपादन डॉ. जी. पी. माळी यांनी केले. विद्यापीठ गीताच्या मोबाईल रिंगटोन्सचे अनावरण करण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापनदिन समारंभात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी शनिवारी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

### माजी विद्यार्थ्यांच्या संपर्कासाठी धोरण राबवा

परदेशी विद्यापीठे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामधील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात. आपणही आपल्या जगभर पसरलेल्या विद्यार्थ्यांशी जोडले जाण्यासाठी धोरण राबविण्याची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा चॅट-जीपीटी ही एका चांगल्या शिक्षकाला कधीही पर्याय ठरणार नसल्याचे डॉ. कुलकर्णी म्हणाले.

- **पुरस्कार विजेत्यांची नावे :** डॉ. जगन कराडे- समाजशास्त्र अधिविभाग, सुरेश बंडगर- सहायक कुलसचिव, विजय माजगावकर- अधीक्षक, नंदिनी पाटील- सहायक अधीक्षक, सदानंद सुभेदार- हावलदार, सतीश केसरकर- ग्रंथालय मदतनीस.
- **गुणवंत प्राचार्य :** डॉ. सर्जेराव रघुनाथ पाटील, प्राचार्य, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.
- **गुणवंत शिक्षक :** डॉ. सारंग भोला, कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये, जि. सातारा.
- **गुणवंत सेवक :** सागर पाटील, मुख्य लिपिक, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, इस्लामपूर, जि. सांगली.
- **बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार :** डॉ. विनोद भीमराव शिपले, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

# 'एआय' चांगल्या शिक्षकाला पर्याय ठरणार नाही


## डॉ. रवींद्र कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा वर्धापन दिन उत्साहात

**▸सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) किंवा चॅट-जीपीटी ही चांगल्या शिक्षकाला कधीही पर्याय ठरणार नाही, असे मत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी आज येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापन दिन समारंभात ते बोलत होते. या वेळी गुणवंत शिक्षक पुरस्कार समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. जगन कराडे यांना, तर बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार डॉ. विनोद शिंपले (न्यू कॉलेज, कोल्हापूर) यांना देण्यात आला. मराठी विज्ञान परिषदेचा प्रा. मनमोहन शर्मा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ. तुकाराम डोंगळे यांचा विशेष सत्कार झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''विवेकी शिक्षक विद्यार्थ्याला वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह माहिती देऊन सक्षम बनवितो. ती क्षमता या तंत्रज्ञानात अद्याप नाही. या तंत्रज्ञानाच्या आधारे बिग डाटा विश्लेषण करत असताना नैतिक मार्गांनी त्याचे व्यवस्थापन आवश्यक आहे. त्यासाठी योग्य धोरणे आखली पाहिजेत. त्याचप्रमाणे लघु व मध्यम उद्योग-व्यवसायांसोबत सहकार्यवृद्धी करण्याच्या दिशेने भारतीय विद्यापीठांनी आगेकूच करण्याची आवश्यकता आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. या वेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाने जगभर पसरलेल्या विद्यार्थ्यांना जोडण्यासाठी धोरण राबवावे. विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक व संशोधकीय कार्याद्वारे ठसा उमटवला असून, आता क्षमतावर्धनाच्या दिशा शोधण्याची आवश्यकता आहे. भविष्यात भारतीय विद्यापीठांना जागतिक वेध घेऊन वाटचाल करावी लागणार आहे. परदेशी विद्यापीठे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामधील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात. शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा आणि पायाभूत सुविधा विकास याकामी त्यांची मदत घेतली जाणे आवश्यक आहे.'' कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

**गुणवंत सेवकांचा गौरव**

विद्यापीठातील गुणवंत सेवकांचा गौरव करण्यात आला. यात सुरेश बंडगर (सहायक कुलसचिव), विजय माजगावकर (अधीक्षक), नंदिनी पाटील (सहायक अधीक्षक), सदानंद सुभेदार (हावलदार), सतीश केसरकर (ग्रंथालय मदतनीस). गुणवंत प्राचार्य : डॉ. सर्जेराव पाटील (देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली). गुणवंत शिक्षक : डॉ. सारंग भोला (कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँन्ड रिसर्च, वर्ये, जि. सातारा), महाविद्यालयीन गुणवंत सेवक : सागर पाटील (मुख्य लिपिक, राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर, इस्लामपूर, जि. सांगली) यांचा समावेश होता.

**दृष्टिक्षेपात**

- उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार प्राणीशास्त्र व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटला
- आधारवड' स्मृतिग्रंथाचे प्रकाशन
- विद्यापीठ गीताच्या रिंगटोनचे लोकार्पण

19 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्काराने डॉ. जगन कराडे यांना गौरविण्यात आले. सोबत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे. यावेळी डॉ. विनोद शिंपले, डॉ. सारंग भोला, डॉ. सर्जेराव पाटील, सदानंद सुभेदार, सतीश केसरकर, नंदिनी पाटील, विजय माजगावकर, सुरेश बंडगर, डॉ. तुकाराम डोंगळे यांचाही सत्कार करण्यात आला.

# डॉ.शिंपले आदर्श शिक्षक तर डॉ. कराडेंना गुणवंत शिक्षक पुरस्कार

## शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक, सेवकांचा सत्कार : नॅक मानांकित २६ महाविद्यालयांचा गौरव

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक, आदर्श शिक्षक, विद्यापीठ गुणवंत सेवक, महाविद्यालयीन गुणवंत सेवक आदी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये कुलसचिव डॉ. विनोद शिंपले यांना बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार तर डॉ. जगन कराडे यांना विद्यापीठ गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मराठी विज्ञान परिषदेचा प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान–तंत्रज्ञान पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नॅनोसायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या डॉ. तुकाराम डोंगळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यापीठ गुणवंत सेवक पुरस्कार सहाय्यक कुलसचिव सुरेश बंडगर, विजय माजगावकर, नंदिनी पाटील, सतीश केसरकर, सदानंद सुभेदार यांना प्रदान करण्यात आला. महाविद्यालयीन गुणवंत सेवक पुरस्कार सागर पाटील (इस्लामपूर), महाविद्यालयीन गुणवंत शिक्षक पुरस्कार डॉ. सारंग भोला (वर्ये, सातारा), महाविद्यालयीन गुणवंत प्राचार्य पुरस्कार डॉ. सर्जेराव पाटील यांना प्रदान करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते.

### 'नॅक' मानांकित २६ महाविद्यालयांचा गौरव

'नॅक'चे ए प्लस प्लस, ए प्लस, आणि ए मानांकन मिळविलेल्या २६ संलग्नित महाविद्यालयांचा वर्धापनदिन समारंभात गौरव करण्यात आला. यामध्ये टेक्स्टाईल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, कोल्हापूर, कर्मवीर हिरे कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँन्ड रिसर्च, कोल्हापूर, डॉ. जे.जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर, श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठ वडगांव, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर, शिवराज कला व वाणिज्य आणि डी.एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली, डॉ. अशोक गुजर टेक्निकल इन्स्टिट्यूटस् डॉ. दौलतराव आहेर इंजिनिअरिंग महाविद्यालय, कराड, दहीवडी महाविद्यालय, दहीवडी, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी. फार्मसी, आष्टा, बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, डी.पी. भोसले महाविद्यालय, कोरेगांव, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी, कोल्हापूर, बळवंत महाविद्यालय, विटा, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर (सातारा), धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा, के आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गोकुळ शिरगांव, कोल्हापूर, श्री वेंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, विलिंग्डन कॉलेज, सांगली, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा (सातारा), तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर आणि आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली यांचा समावेश आहे.

Times of India

# VARSITY FORMATION DAY

Picture courtesy: SUK



Shivaji University, Kolhapur, lit up on the occasion of its 61st Formation Day on Saturday